# वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर

**जुने सचिवालय इमारत, जी.पी.ओ.समोर, सिव्हील लाईन्स, नागपूर- ४४०००१**

**दूरध्वनी :०७१२ २५६१२४७ ईमेल : textilecomm.ng-mh@gov.in संकेतस्थळ :www.dirtexmah.gov.in**


**-: जाहीरात :-**

सहायक आयुक्त (तांत्रिक) गट ब राजपत्रित संवर्गातील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नामिकासूची करणेबाबत

वस्त्रोद्योग आयुक्तालय महाराष्ट्र शासन नागपूर सहायक आयुक्त (तांत्रिक) गट ब राजपत्रित या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची नामिकासूची करण्याचे नियोजित आहे.

या नामिकासूचीतील अधिकाऱ्यामार्फत खालील कामे करून घेण्यात येतील.

१. एकात्मिक शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२०२८ अंतर्गत योजनेतील MAHATUFS,सौर ऊर्जा प्रकल्पाबाबत नवीन घटकांना मार्गदर्शन करणे.
२. एकात्मिक शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२०२८ अंतर्गत स्थापित होणाऱ्या टेक्नीकल टेक्सटाईल पार्क करीता तांत्रिक सल्लागार म्हणुन कामकाज करणे.
३. महाराष्ट्र राज्यात वस्त्रोद्योग संकुल (Textile Park) स्थापन करण्याकरीता तांत्रिक सल्लागार म्हणुन कामकाज करणे.
४. राज्यातील हातमाग, यंत्रमाग व सूतगिरण्या करीता लागणारे अद्यावत यंत्रसामुग्री स्थापन करण्याकरीता तांत्रिक सल्लागार म्हणुन कामकाज करणे.
५. वस्त्रोद्योग घटकांकरीता योजनांचे मुल्यमापन व इतर विवक्षित तांत्रिक सल्लागार म्हणुन सेवा / कामकाज करणे.
६. गारमेंटीग क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुचविणे.
७. वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ चे प्रचार आणि प्रसिध्दीसाठी सहकार्य करणे.
८. आयुक्त् वस्त्रोद्योग यांनी वेळोवेळी सोपविलेली कामे.

या जाहीरातीव्दारे करावयाची नामिकासूची शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७ डिसेंबर २०१६ मधिल तरतुदीनुसार करण्यात येईल व करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना शासन निर्णयातील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक देण्यात येईल. कामाचे मुख्यालय नागपूर राहिल.

नामीकासूचीत समाविष्ट झाल्यामुळे सेवानिवृत्त अधिकाऱ्यास काम मिळेल. याची कोणतीही हमी देण्यात येणार नाही. अधिकाऱ्यांचा अनुभव व त्यांचा वरील मुद्याबाबतचा अभ्यास याचा विचार करुन आवश्यकतेनुसार विशिष्ट कालावधीकरीता वरील शासन निर्णयानुसार नियुक्तीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

अधिक माहितीसाठी **www.directortextile.com** या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या अटी व शर्तीचे अवलोकन करावे.

इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी दि. १२.०२.२०२४ पर्यंत आपले अर्ज PDF मध्ये **textilecomm.ng-mh@gov.in** या E-mail Id वर सादर करावेत तसेच अर्ज केलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी मुलाखतीकरीता दि. १४.०२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता खालील पत्यावर या आयुक्तालयात उपस्थित रहावे.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :- वस्त्रोद्योग आयुक्तालय महाराष्ट्र शासन जुने सचिवालय इमारत, जी.पी.ओ. समोर सिव्हिल लाईन नागपूर-४४०००१**

( गोरक्ष गाडीलकर ) भाप्रसे
आयुक्त
वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर

## नामिकासूचीतील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांसाठी अटी व शर्ती :-

१. नामिकासूची ३ वर्ष कालावधीकरीता करण्यात येईल. व त्याबाबत वार्षीक आढावा घेवून विषय किंवा पॅनल च्या सदस्यांमध्ये वाढ किंवा घट करण्यात येईल.

२. विवक्षित कामाचे स्वरूप आणि व्याप्ती विचारात घेवून ते काम पुर्ण करण्याचा कालावधी निश्चित करून सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त सहा महीन्यासाठी देण्यात येईल व आवश्यकता असल्यास नियुक्तीचे वाढीव कालावधिकरीता नुतनिकरण करण्यात येईल. परंतु असा कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

३. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७ डिसेंबर २०१६ मधिल तरतुदीनुसार मासिक परिश्रमिक अनुज्ञेय राहील.

४. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशाबाबत / सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार /हक्क नसेल.

५. करार पध्दतीने नियुक्ती करतांना वयाची कमाल मर्यादा ही ६५ वर्षापेक्षा अधिक नसेल.

६. असा सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी शारीरीक मानसीक वा आरोग्याचा दृष्टीने सक्षम असलेबाबत तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांचेकडे आवश्यक क्षमता असल्याबाबत खातरजमा करण्यात येईल.

७. नियुक्तीच्या कालावधित करार पध्दतीने विवक्षित काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तींची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र त्यांचेकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात / हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासनाने या निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती , करार पध्दतीवरील उमेदवाराकडुन नियमीत सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही. याचा समावेश करून सदर अटी मान्य असल्याचा उल्लेख करण्यात येईल.

८. अशा अधिकाऱ्याविरूध्द कोणतेही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसल्याबाबतची खातरजमा करण्यात येईल.

९. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी / कर्मचारी यांच्या करार पध्दतीवर सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहतील.

१०. असा अधिकारी यांनी Conflict of Interest जाहीर करणे आवश्यक राहील.

११. अशा अधिकाऱ्यांना / कर्मचारी वाहन अनुज्ञेय/ उपलब्ध असणार नाही तसेच अशा अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्ती वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१२. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्राबाबत माहीती व अगर सामुग्रीबाबत गोपनियता बाळगणे आवश्यक राहील.

१३. करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेले अधिकारी / कर्मचारी वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य नागपूर या कार्यालयाचे नियंत्रणाखाली कार्यरत असतील.

१४.नियुक्त करण्यांत आलेले अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्यावर दिलेले कामकाज निश्चीत केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामकाजाचे मुल्यमापन करतील.

१५.अशा अधिकारी/ कर्मचारी यांनी तयार केलेले अहवाल/ प्रस्ताव आयुक्तालयाच्या मान्यतेअंती शासनास सादर करता येईल.

१६.करार पध्दतीने घेण्यांत आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना सोपविण्यांत येणाऱ्या कामकाजाचे स्वरुप आयुक्त वस्त्रोद्योग , महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे अंतीम निर्णयाने ठरेल.

१७.करार पध्दतीने घेण्यांत आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची बैठक व्यवस्था उपलब्ध असलेल्या जागेनुसार करण्यांत येईल.

१८.अशा अधिकारी / कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर २०१६ तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१८/प्रक्र.११३/आ.पु.क. दिनांक ११ डिसेबंर २०१८ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

(गोरक्ष गाडीलकर) भाप्रसे
आयुक्त
वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य,
नागपूर